

गौरी-गणपती विसर्जन

| वर्ष - 9 | अंक -16 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 2 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



आतील पानांत

- महिला विजेते करणार छप्परतोड कमाई
- टीव्हीवर प्रक्षेपण नाही, मैदानात प्रवेश नाही
- रशियन तेलाचा ब्राह्मणांना लाभ!
- आता हायड्रोजन बॉम्ब येणार



## मुंबई हायकोर्टाचे कडक आदेश: आंदोलकांना रस्त्यांवरून हटवण्याचे निर्देश

# मराठा आंदोलन कोर्टाच्या "कचाट्यात"!

## मुंबईतील रस्ते मोकळे करा : बाहेरून आलेल्या आंदोलकांना वेशीवर थांबवा

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**मुंबईतील मराठा आरक्षण आंदोलनात नियमांचे उल्लंघन केल्याने मुंबई हायकोर्टाने आंदोलकांना कडक फटकारलं आहे. कोर्टाने उद्या (मंगळवार) दुपारी ४ वाजेपर्यंत सर्व आंदोलकांना रस्त्यांवरून हटवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, बाहेरून आलेले आंदोलक मुंबईच्या वेशीवरच थांबवण्याचे आदेश दिले आहेत.**



कोर्टाने म्हटले की, "गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत कोंडी होऊ नये. मुंबईतील रस्ते मोकळे करा आणि आंदोलकांना रस्त्यांवरून हटवा." न्यायालयाने स्पष्ट केले की, "आंदोलनाच्या कारणावर चर्चा न करता, नियमांचे पालन महत्त्वाचे आहे. शाळा-महाविद्यालये आणि नोकऱ्यांवर होणारा परिणाम टाळा."

### बाहेरून आलेल्या आंदोलकांना थांबवण्याचे आदेश

कोर्टाने मुंबईतील रस्त्यांवर होणारी कोंडी लक्षात घेत बाहेरून आलेल्या आंदोलकांना मुंबईच्या वेशीवरच थांबवण्याचे निर्देश दिले. "मुंबईत असलेल्या आंदोलकांना ज्या ठिकाणी रस्ता अडवले आहेत, त्या सर्व ठिकाणाहून आंदोलनकार्यांना हटवा," असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले.

वकिलांना उत्तर देण्याची भूमिका आंदोलनकार्यांच्या वकिलांनी कोर्टात ५ हजार आंदोलकांची परवानगी असल्याचे सांगितले, पण त्या संख्येपेक्षा अधिक लोक रस्त्यांवर आले आहेत. यावर कोर्टाने वकिलांना प्रश्न केला की, "तुम्ही ५ हजार आंदोलक वगळून उर्वरित सर्व आंदोलकांना माघारी पाठवू शकता का?" मनोज जरांगे यांच्या वकिलांची स्टेडियममध्ये आंदोलन करण्याची मागणी मनोज जरांगे यांच्या वकिलांनी आंदोलकांसाठी वानखेडे आणि ब्रेबोर्न स्टेडियममध्ये स्थायिक होण्याची मागणी केली.

"जर स्टेडियममध्ये आंदोलकांना ठेवल्यास त्यांच्यावर नियंत्रण ठेवता येईल," अशी वकिली केली. परंतु कोर्टाने त्याला नकार देताना, "हे ऐतिहासिक स्थळ आहे, त्याठिकाणी आंदोलन करण्याच्या कायदेशीर अडचणी होऊ शकतात," असे स्पष्ट केले.

सरकारी वकिलांचे स्पष्टीकरण सरकारी वकिलांनी सांगितले की, आंदोलकांना एकाच दिवशी आंदोलन करण्याची परवानगी दिली होती. यानंतर आंदोलनाला परवानगी दिली गेली नाही, आणि रस्ता रोको करण्याचा अधिकार आंदोलकांना नाही. यावर कोर्टाने आंदोलकांच्या वकिलांना प्रश्न केला की, "तुम्ही नियमांचे पालन करणार का?"

### नियमांचे पालन करण्याची आवश्यकता

कोर्टाने सांगितले की, "मुंबईकरांना अनावश्यक त्रास होऊ नये, तसेच शहराच्या वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होऊ नये." न्यायालयाने सरकार आणि आंदोलकांना सुस्पष्ट निर्देश दिले की, सर्वांनी नियमांचे पालन केले पाहिजे. मुंबई हायकोर्टाचे हे आदेश आंदोलक आणि प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरणार असून, त्यानुसार कारवाई केल्यास शहरात वाहतूक कोंडी टाळता येईल आणि जनजीवन सामान्य होईल, अशी अपेक्षा आहे.

**गृहसंकुल टँकरमुक्त** मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय, दोन महिन्यांनी बैठका

# गृहसंकुल टँकरमुक्तसाठी समिती

## समस्या थेट ऐकली जाणार

| पुणे |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाणीटंचाईमुळे टँकरवरील अवलंबित्व दिवसेंदिवस वाढत असताना, मुंबई उच्च न्यायालयाने पिंपरी-चिंचवडमधील गृहसंकुलांना टँकरमुक्त करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार, विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती स्थापन करण्यात आली असून, दर दोन महिन्यांनी ही समिती गृहसंकुलांचे प्रश्न ऐकून त्यावर निर्णय घेणार आहे.**




सार्वजनिक हिताच्या याचिका (PIL) क्रमांक 25/2016, 36/2016 व 126/2022 च्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला निर्देश दिले की, पाणीटंचाईच्या तक्रारी सोडवण्यासाठी समितीची स्थापना करावी. त्या नुसार माननीय विभागीय आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षते खाली समितीची स्थापना झाली असून त्यात पुणे महापालिका व पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, तसेच इतर वरिष्ठ अधिकारी सदस्य आहेत. ही समिती प्रत्येक दोन महिन्यांनी बैठका घेत असून, पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या गृहसंकुलांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत आहे. या बैठकींमध्ये विभागीय आयुक्त संबंधित महापालिका आयुक्तांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश देत आहेत व कार्यवाहीचा अहवाल न्यायालयात सादर करीत आहेत. सन 2022 मध्ये ज्या अकरा संस्थानीं मिळून ही जनहित याचिका दाखल केली त्या मध्ये पिंपरी चिंचवड हाऊसिंग फेडारेशाचा देखिल समावेश आहे. पिंपरी-चिंचवड को-ऑप. हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने यासंदर्भात जनजागृती मोहीम सुरू केली असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. अनेक सोसायट्या टँकरच्या खर्चामुळे त्रस्त असल्या तरीही या समितीसमोर तक्रार सादर करण्यासाठी फारशा पुढे येत नाहीत, हे खेदजनक आहे, असे फेडरेशनने स्पष्ट केले. गृहसंकुलांनी समितीकडे तक्रार सादर करण्यासाठी काय प्रक्रिया आहे, कोणती कागदपत्रे लागतात, याची माहिती घेण्यासाठी फेडरेशनच्या प्रतिनिधींशी संपर्क साधावा. ते संपूर्ण मार्गदर्शन करतील, असे आवाहनही फेडरेशनने केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : दत्तात्रय देशमुख 9936655255, सचिन लोंढे : 8888966676, सचिन गुणाले : 9766304648.

### न्याय गंगा प्रवाहित ठेवली

“ आमच्या फेडरेशनने पुढाकार घेऊन ही जनहित याचिका इतर दहा संस्थाना सोबत घेऊन दाखल केली. न्यायालयाने योग्य ते निर्देश देऊन न्याय गंगा प्रवाहित ठेवली आहे. याचा सर्वांनी काभ घ्यायला हवा. हा न्याय मिळवून देणे साठी पुणे येथील जागरूक ऍडव्होकेट श्री सत्या मुळे सर यांनी नि:शुल्क काम पाहिले. अजूनही पहात आहेत. त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच.

**-दत्तात्रय देशमुख,** चेअरमन.

### नि:शुल्क मोहीम

“ आमच्या फेडरेशनने न्यायालयीन लढाई द्वारे सोसायट्याना उपलब्ध करुन दिलेल्या या प्रभावी पर्याया विषयी आम्ही जनजागृती मोहीम चालू केली असून न्यायालयीन आदेशाचा कसा फायदा घ्यावा या साठी हाऊसिंग सोसायट्यानी आमचेशी अवश्य संपर्क साधावा. सामाजिक कृतज्ञता भावनेतून आम्ही ही मोहीम राबवीत असून ती नि:शुल्क आहे.

**- सचिन लोंढे,** उपाध्यक्ष.

# निगडी-चाकण मेट्रो मार्गाला गती

## पिंपरी-चिंचवड ते चाकण औद्योगिक पट्टा जोडणारा महत्त्वाचा टप्पा

| पुणे |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहर व चाकण औद्योगिक परिसराला जोडणाऱ्या निगडी-चाकण मेट्रो मार्गाच्या विस्तारीकरणाला वेग आला आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) कडून या मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) महापालिकेकडे सादर करण्यात आला असून, या आराखड्याचे सादरीकरण फुगेवाडी येथील मेट्रो कार्यालयात झाले.**



या बैठकीला विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, महा मेट्रोचे संचालक अतुल गाडगीळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

**प्रस्तावित मार्ग**

निगडीतील भक्ती शक्ती चौक – मुकाई चौक – किवळे-भुजबळ चौक – वाकड साई चौक – पिंपळे सौदागर (जगताप डेअरी–कोकणे चौक) – नाशिक फाटा – संत तुकारामनगर चौक – गवळी माथा चौक – भोसरी डिस्ट्रिक्ट सेंटर – गोडाऊन चौक – चाकण असा मार्ग प्रस्तावित आहे.

**सहा डब्यांच्या मेट्रोची मागणी**

शहरातील वाढत्या लोकसंख्येचा आणि प्रवाशांच्या संख्येचा विचार करून तीनऐवजी सहा डब्यांच्या मेट्रो रचना कराव्यात, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे. तसेच, मेट्रो मार्गावर भविष्यात वाहतूककोंडी होऊ नये यासाठी आवश्यक ठिकाणी उड्डाणपुलांची शक्यता तपासण्याचे निर्देश देण्यात आले.

**लोकप्रतिनिधींच्या सूचना**

खासदार श्रीरंग बारणे: वाहतूककोंडी टाळण्यासाठी उड्डाणपुलांचा अभ्यास करावा.

आमदार महेश लांडगे: भक्ती-शक्ती चौक ते कॅनबे चौक (तळवडे) मार्गे चाकण एमआयडीसी टप्पा पाचसाठी स्वतंत्र मार्गिका प्रस्तावित करावी.

### पुढील प्रक्रिया

महापालिकेकडे आलेल्या सूचनांचा विचार करून हा प्रकल्प अहवाल शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या विषयावर बैठक होणार असल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

5 नवीन मेट्रो मार्गिका | भक्ती शक्ती निगडी - कॅनबे चौक- चाकण एमआयडीसी टप्पा

# मेट्रो प्रशासन सर्व्हे अन् डीपीआर तयार करणार

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आग्रही भूमिका; शहरात मेट्रो विस्तार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रो विस्तार करताना भक्ती शक्ती निगडी- कॅनबे चौक (तळवडे) ते चाकण एमआयडीसी टप्पा-5 अशी नवीन मार्गिका प्रस्तावित करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व्हे आणि डीपीआर तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी आग्रही भूमिका घेतली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहर व चाकण औद्योगिक पट्ट्यासाठी महत्त्वाकांक्षी मानला जाणारा भक्तिशक्ती चौक निगडी ते चाकण मेट्रो मार्ग आता प्रत्यक्षात वेगाने आकार घेण्याच्या मार्गावर आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) महा-मेट्रोकडून सादर करण्यात आला. यावेळी मनपा आयुक्त शेखर सिंह, महा-मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, भोसरी- दिघी परिसरात औद्योगिक आणि निवासी क्षेत्राचा झपाट्याने विकास होत आहे. आगामी 25 वर्षांचा विचार करता या भागात मेट्रो कनेक्टिव्हीटी आवश्यक आहे. मेट्रोचे काम करण्यासाठी डीपीआर हा सर्वसमावेशक आणि शहरातील सर्व भागांना समान न्याय देणारा असायला हवा. 'डीपीआर' तयार करण्यापूर्वीच प्रशासनाने लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे अपेक्षीत आहे.

**भोसरी परिसरात नवीन स्टेशन हवे...**

भोसरी- दिघी परिसरात औद्योगिक आणि निवासी क्षेत्राचा झपाट्याने विकास होत आहे. आगामी 25 वर्षांचा विचार करता या भागात मेट्रो कनेक्टिव्हीटी आवश्यक आहे. मेट्रोचे काम पूर्ण करण्यासाठी डीपीआर हा सर्वसमावेशक आणि शहरातील सर्व भागांना समान न्याय देणारा असायला हवा. त्यासाठी 'डीपीआर' अंतिम करताना लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा समावेश करावा. नाशिक फाटा- भोसरी- मोशी- चाकण या नवीन मार्गिका तसेच भक्तिशक्ती निगडी- कॅनबे चौक- चाकण एमआयडीसी टप्पा-5 मार्गिकासासाठी सर्वे करावा, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली आहे.

> “ चाकण औद्योगिक पट्ट्यातून पुण्याकडे जाणारे प्रवासी भक्ती-शक्ती-कॅनबे चौक- चाकण एमआयडीसी टप्पा-5 या नवीन मार्गिकेने प्रवास करतील. त्यामुळे पुणे-नाशिक महामार्गावरील रहदारी व कोंडी कमी होण्यास मदत होईल. भोसरीमध्ये नवीन स्टेशन प्रस्तावित करावे. त्या अनुशंगाने या मार्गाचा प्राधान्याने विचार करुन तशी दुरूस्ती 'डीपीआर'मध्ये करावी, अशी सूचना प्रशासनाला केली आहे. यावर ठोस कार्यवाही करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेण्यात येणार आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

> “ भक्ती-शक्ती-कॅनबे चौक ते चाकण एमआयडीसी टप्पा-5 आणि नाशिक फाटा- भोसरी- मोशी- चाकण अशी नवीन मार्गिका प्रस्तावित करावी. तसेच, भोसरीमध्ये नवीन स्टेशन निर्माण करावे, अशी सूचना आहे. त्या अनुशंगाने प्रशासनाकडून येत्या आठ दिवसांत पाहणी करुन सर्वेक्षण व अहवाल तयार करण्याची सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केली आहे.
> **-श्रावण हर्डिकर,** व्यवस्थापकीय संचालक, पुणे मेट्रो.

# निर्माल्यापासून सुगंधी द्रव्य व खतनिर्मिती

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती; पिंपरी चिंचवड महापालिकेने विसर्जन स्थळांवर उभारली निर्माल्य संकलन कुंडे

। पिपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रत्येक वर्षी विसर्जनावेळी मोठ्या प्रमाणात निर्माल्य पाण्यात मिसळल्याने जलप्रदूषण वाढते. या समस्येवर मात करण्यासाठी शहरभरात निर्माल्य संकलन कुंडे बसवण्यात आली आहेत. या कुंड्यात जमा झालेले निर्माल्य पुढील प्रक्रिया करून सेंद्रिय खत निर्मितीसाठी वापरले जाणार असून, त्याचबरोबर त्यावर प्रक्रिया करून सुगंधी द्रव्ये तयार करण्याचाही उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले.**




गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धन आणि जलस्रोतांचे रक्षण या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे आणि उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील प्रमुख विसर्जन स्थळांवर निर्माल्य संकलन कुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे.

त्यामुळे नागरिकांनी विसर्जनावेळी हार, फुले, माळा, पाने आणि अन्य पूजेसाठी वापरलेले साहित्य थेट नदी-नाल्यात किंवा पाण्यात न टाकता या कुंड्यात टाकावे, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. नागरिकांनी निर्माल्य नदीपात्रात न टाकता निर्माल्य संकलन कुंडामध्ये टाकावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे केवळ नदी-नाल्यांतील प्रदूषण कमी होणार नाही, तर जमा झालेले निर्माल्य सेंद्रिय खत आणि सुगंधी द्रव्य निर्मितीसाठी वापरल्याने पुनर्वापर संस्कृतीला चालना मिळणार आहे. शहरात स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास या तिन्ही उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

> “ गणेश विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांनी आवर्जून निर्माल्य कुंडांचा वापर करावा. नद्या, तलाव स्वच्छ ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळाल्यास हा उपक्रम यशस्वी होईल आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव आपल्याला साजरा करता येईल.
> **–सचिन पवार,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



'स्टेट'मेंन्ट
राहुल जगताप

### आनंद कशामुळे मिळतो ?

सृष्टी शून्यापासून निर्माण झाली. आपलीही मूळ स्थिती तीच आहे, म्हणून आपण शून्याकडे जाण्याचा प्रयत्न करावा; म्हणजेच, स्वानंदात स्वस्थ राहावे. पण ते आपल्या हातून होत नाही, कर्म करीतच राहावे असे वाटते. प्रपंचाची दगदग झाली म्हणजे आपण दूर जाऊन बसतो; पण मनाची तळमळ त्यामुळे नाहीशी झाली नाही, तर काय उपयोग ? याकरिता मनाची स्वस्थता कशाने येईल ते पाहावे. आनंद कुणाला नको आहे ? आपल्याला आनंद हवा आहे खरा, परंतु तो मिळविण्यासाठी जे करायला पाहिजे ते आपण करीत नाही. नोकरी नको आणि खायला हवे, हे कसे शक्य आहे ? खरोखर, प्रपंचाच्या या अगणित उपाधींतून सुटून जो स्वास्थ्याकडे जातो तो धन्यच होय. मनाच्या विरुद्ध गोष्टी झाल्या की लगेच आपल्या आनंदात बिघाड येतो; याकरिता, आपल्या इच्छेविरुद्ध घडले तरी माझे स्वास्थ्य बिघडणार नाही, इकडे पाहावे. याला एकच उपाय आहे, आणि तो म्हणजे माझी इच्छाच मी नाहीशी करणे. कोणतीही वस्तू मिळावी किंवा अमुक एक गोष्ट घडावी, ही बुद्धीच ठेवू नये. जोपर्यंत हाव आहे तोपर्यंत स्वास्थ्यापासून आपण दूर आहोत असे समजावे. महत्त्वाकांक्षा खुशाल धरावी, पण त्यामुळे मनाला त्रास होऊ देऊ नये. भगवंताची इच्छा तीच माझी इच्छा असे म्हणावे, आणि अभिमान सोडून कर्म करीत राहावे. प्रयत्न करून जे काही होते, ते रामाच्या इच्छेने झाले म्हणावे. कर्तेपणाचा अभिमान सोडल्यानेच स्वास्थ्य लाभते. मागे घडलेल्या चांगल्या-वाईट गोष्टी आठवत राहणे यामुळे आनंदात बिघाड येतो. तसेच उद्यांची काळजी करीत राहाणे यामुळेही मनाच्या स्वास्थ्यात व्यत्यय येतो. होते-जाते हे सर्व भगवंताच्या इच्छेने होते, हे मनाने पक्के ठरविल्यावर मग विनाकारण काळजी का करावी ?
दु:ख करणे अथवा न करणे हा मनाचा धर्म असल्यामुळे, ज्या माणसाने मनाला योग्य वळण दिले आहे, तो प्रत्यक्ष दुखणे भोगीत असताही आनंदात राहू शकेल. म्हातारपणी तर आनंद हे मोठे शक्तिवर्धक औषध आहे. ज्याला नामाचे प्रेम आले त्याला शरीराच्या कोणत्याही अवस्थेत आनंदाचा लाभ होतो; आणि ज्याला असा आनंदाचा लाभ झाला, त्याच्यावर रामाने कृपा केली असे खचित समजावे. भगवंतासाठी एकच दान खरे आहे, आणि ते म्हणजे आत्मदान होय. सतत भगवंताच्या नामात राहून देहाची विस्मृती होणे हा आत्मदानाचाच प्रकार आहे.
बोधवचन:- वाणीने नाम घ्यावे व मनाने स्मरण करावे, आणि या दोन्हीचा मेळ असावा.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# मराठा आरक्षणाचा संघर्ष !

# सामाजिक समरसतेची आवश्यकता

**महाराष्ट्रात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यामुळे सध्या राज्यात मोठं राजकीय आणि सामाजिक वातावरण तापलं आहे. महाराष्ट्रातील प्रमुख समाजांमध्ये आरक्षणाच्या मागणीला तीव्र विरोध व समर्थन मिळत आहे. विशेषतः, मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला ओबीसी समाजाचे कडाडून विरोध आहे, ज्यामुळे तणाव आणि संघर्ष वाढत आहेत. अशी परिस्थिती निर्माण होण्याची कारणं आणि त्यामागची सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक कारणे समजून घेणं महत्त्वाचं आहे.**



### मराठा आरक्षणाची मागणी

मराठा समाज महाराष्ट्रातील एक मोठा, प्रभावशाली आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण समुदाय आहे. मराठा समाजाने पिढ्यान्पिढ्या राज्याच्या राजकारण, समाजसेवा आणि सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मात्र, त्याला शैक्षणिक आणि सरकारी सेवांमध्ये आरक्षण न मिळाल्यामुळे तो आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेला आहे, असं अनेक दृष्टीकोनातून सांगितलं जातंय. यामुळे, मराठा समाजाने ओबीसी प्रवर्गात आरक्षण मिळवण्याची मागणी केली आहे.

### ओबीसी समाजाचा विरोध

मराठा समाजाची आरक्षणाची मागणी ओबीसी समाजाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभं करणार्या बनली आहे. महाराष्ट्रातील ओबीसी समाज विविध जातींचा समावेश असलेला एक मोठा गट आहे, ज्यात सुमारे 346 जातींचा समावेश आहे. यामध्ये बेरड, भामटा, कैकाडी आणि इतर विमुक्त भटक्या जमातींचाही समावेश आहे. ओबीसी समाजाच्या मनामध्ये ही चिंता आहे की, मराठा समाजाच्या आरक्षणामुळे त्यांना त्यांचा हक्क गमवावा लागेल, खासकरून शैक्षणिक आणि सरकारी सेवांमधील आरक्षणाच्या बाजूला.

### विविध समाजांचे आरक्षण आणि राज्यातील तणाव

महाराष्ट्रात आरक्षणाची व्यवस्था अत्यंत जटिल आहे. अनुसूचित जाती (SC) साठी 13%, अनुसूचित जमाती (ST) साठी 7%, ओबीसी समाजासाठी 19%, आणि विशेष मागासवर्गासाठी 2% आरक्षण आहे. मराठा समाजाला 10% आरक्षण EWS (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक) कोट्यातून देण्यात आले आहे. या सर्व आरक्षणांमुळे राज्यात आरक्षणाच्या वाटपाबद्दल अनेक प्रश्न उपस्थित होतात.
मुख्य मुद्दा असा की, अनेक गटांमध्ये आरक्षणाची टक्केवारी वाढवण्याचा प्रयत्न होतो आहे, आणि हे वाढलेलं आरक्षण अन्य गटांना दिलेल्या हक्कांचा अतिक्रमण करतं. परिणामी, या सर्व गटांमध्ये सामाजिक तणाव निर्माण होतो. हे तणाव राज्यातील सामाजिक समरसतेला धक्का देतात.

### सामाजिक समरसतेची आवश्यकता

आरक्षणाचा मुद्दा जरी महत्त्वाचा असला तरी, त्याच्या पार्श्वभूमीवर एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, समाजात समरसता आणि एकोपा टिकवणे हे खूप महत्त्वाचं आहे. प्रत्येक गटाला योग्य प्रमाणात आरक्षण मिळावं, ही नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे. मात्र, ते आरक्षण ज्या प्रकारे दिलं जातं आणि त्याचा प्रभाव कसा पडतो, हे एक मोठं प्रश्नचिन्ह आहे.

महाराष्ट्रात आरक्षणाच्या चर्चेमध्ये काही महत्त्वाचे मुद्दे दुर्लक्षले जात आहेत. आरक्षणावर आधारित राजकारण आणि गटांच्या संघर्षामुळे विविध समाजांमध्ये तीव्र असंतोष वाढत आहे. हे असंतोष समाजाच्या एकोप्याला धक्का देत आहेत आणि त्यामुळे समाजातील एकतेला धक्का बसू शकतो. यामुळे, सरकार आणि सामाजिक नेतृत्वाला उत्तरदायित्व असायला हवं, की ते समाजातील सर्व गटांच्या गरजा आणि आकांक्षांचा आदर करत, एक आदर्श सामाजिक संरचना तयार करतात.
मराठा आरक्षणाच्या मुद्द्यामुळे राज्यातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक वातावरण अधिकच गडबडलेलं आहे. सर्व समाज गटांमध्ये समान अधिकार आणि संधी असाव्यात, ह्याच्याशी कोणालाही विरोध नसावा. मात्र, या सर्व मुद्द्यांना शांततेने आणि न्यायाने हाताळणं आवश्यक आहे. राज्य सरकारने आणि अन्य संबंधित नेत्यांनी अशा प्रकारची व्यवस्था तयार केली पाहिजे, ज्यामुळे एकतर्फी असंतोष वाढणार नाही, आणि सामाजिक समरसता टिकवता येईल. समाजात सुसंवाद, सहकार्य आणि सामंजस्य वाढवूनच आपण सर्वांच्या हिताचा विचार करू शकतो, आणि म्हणूनच, आरक्षणाच्या वादावर न थांबता, आपण एक दुसऱ्याला समजून घेत, सामूहिक प्रगतीच्या दिशेने पुढे जाऊया.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

२०० कोटी निधी मंजूर

अंमलबजावणीसाठी मात्र कृषी विभागाला प्रतीक्षा

# समृद्धीसाठी 200 कोटींचा निधी मंजूर!

## कृषी विभागाला मार्गदर्शक तत्त्वे

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारच्या कृषी समृद्धी योजनेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अद्याप कृषी विभागाला मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे निधी मंजूर मात्र योजनेची कार्यवाही नाही, असे चित्र सध्या निर्माण झालेले आहे.**



त्यासाठी राज्य सरकारकडून १७८ कोटी रुपयांचा व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत २२ कोटी रुपये असा एकूण २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती कृषी विभागाकडून उपलब्ध झाली. राज्य सरकारने सर्वसमावेशक पीक योजनेमध्ये बदल करत पीक कापणी प्रयोगावर आधारित सुधारित पिकविमा योजना राबवण्याचा निर्णय घेतला. या खर्चाच्या बचतीतून राज्य सरकारला सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. त्यातून कृषी समृद्धी योजनेसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्या अंतर्गतच नगर जिल्ह्याला २०० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे प्रकल्प संचालकांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने कृषी समृद्धी योजनेच्या अंमलबजावणीसाठी समिती नेमली होती. या समितीने कृषी विकास, उत्पादकता, कृषी क्षेत्रातील समस्या, विविध योजनांतील जिल्हानिहाय निधी वापर, याबाबतचे दस्तऐवजांचे परीक्षण, कृषी गुंतवणुकीसाठी उपलब्ध विविध केंद्र व राज्याच्या निधीचा अभ्यास, कृषी क्षेत्रातील हवामान लवचिकतेचे पैलू तपासून सरकारला अहवाल दिला. त्यानंतर हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने हवामान अनुकूल, बाजार केंद्रित, नवीन तंत्रज्ञान आधारित व सर्वसमावेशक कृषी विकास करण्यासाठी यंदापासून कृषी समृद्धी योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे.शेतकऱ्यांना थेट लाभाचे हस्तांतरण केले जाणार आहे. त्यासाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र योजनेच्या अंमलबजावणीसाठीची मार्गदर्शक तत्त्वे अद्याप कृषी विभागाला प्राप्त झालेली नाहीत. कृषी समृद्धी योजनेचा निधी हा भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढवणे, हवामान अनुकूल शाश्वत शेतीला प्रोत्साहन यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातून डीबीटीद्वारे राबवल्या जाणाऱ्या योजनेतून सूक्ष्म सिंचन, यांत्रिकीकरण, डिजिटल शेती, प्रक्रिया व निर्यात यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. मात्र डीबीटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कोणता लाभ मिळणार याचे अद्याप स्पष्ट आदेश नाहीत. शेतकऱ्यांना एआय तंत्रज्ञान, ड्रोन आदी आधुनिक सुविधा पुरविल्या जाव्यात यासाठी प्रयत्न आहेत. राज्य सरकारकडून १७८ कोटी रुपयांचा व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत २२ कोटी रुपये असा एकूण २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती कृषी विभागाकडून उपलब्ध झाली. राज्य सरकारने सर्वसमावेशक पीक योजनेमध्ये बदल करत पीक कापणी प्रयोगावर आधारित सुधारित पिकविमा योजना राबवण्याचा निर्णय घेतलाप्रकल्प संचालकांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने कृषी समृद्धी योजनेच्या अंमलबजावणीसाठी समिती नेमली होती. या समितीने कृषी विकास, उत्पादकता, कृषी क्षेत्रातील समस्या, विविध योजनांतील जिल्हानिहाय निधी वापर, याबाबतचे दस्तऐवजांचे परीक्षण, कृषी गुंतवणुकीसाठी उपलब्ध विविध केंद्र व राज्याच्या निधीचा अभ्यास, कृषी क्षेत्रातील हवामान लवचिकतेचे पैलू तपासून सरकारला अहवाल दिला.

### २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर

त्यानंतर हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने हवामान अनुकूल, बाजार केंद्रित, नवीन तंत्रज्ञान आधारित व सर्वसमावेशक कृषी विकास करण्यासाठी यंदापासून कृषी समृद्धी योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे.शेतकऱ्यांना थेट लाभाचे हस्तांतरण केले जाणार आहे. त्यासाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

# डॉक्टरांना निलंबित करा

## वैद्यकीय तपासणीसाठी आलेल्या डॉक्टरांवर जरांगे संतापले

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावं, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन सुरू केलं आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर त्यांचं हे आंदोलन सुरू असून आज आंदोलनाचा चौथा दिवस आहे. या आंदोलनात महाराष्ट्रातील लाखो मराठा आंदोलक सहभागी झाले आहेत.**



दरम्यान, मनोज जरांगे शुक्रवारपासून आंदोलनाला बसले असल्यामुळे त्यांना अशक्तपणाचा त्रास जाणवत आहे. त्यामुळे त्यांची डॉक्टरांच्या टीमकडून वेळोवेळी तपासणी केली जात आहे.

दरम्यान, आज रात्री डॉक्टरांची टीम वैद्यकीय तपासणीसाठी आली असता मनोज जरांगे पाटील यांनी वैद्यकीय तपासणी नाकारली. मात्र, याचवेळी तपासणीसाठी आलेल्या डॉक्टरांवर मनोज जरांगे चांगलेच संतापल्याचं पाहायला मिळालं. तपासणीसाठी आलेल्या सर्व डॉक्टरांना निलंबित करा अशी मागणी त्यांनी थेट आरोग्यमंत्र्यांकडे केली.ते आमच्या डॉक्टरांकडे तपासणी यंत्र मागत होते.

### मनोज जरांगे काय म्हणाले?

मी न्यायदेवतेचं मनापासून कौतुक करतो आणि जाहीरपणे सांगतो, माझं हे शेवटचं सांगणं आहे. आंदोलकांच्या ज्या गाड्या रस्त्यावर आहेत त्या तुम्ही तातडीने मैदानात नेहून लावा. तुम्ही देखील मैदानात थांबा. जर तुम्हाला आरक्षण हवं नसेल आणि तुम्हाला कोणाचं ऐकून गोंधळ करायचा असेल तर तुम्ही तुमच्या गावी जाऊ शकता.

तेव्हा मी आलेल्या डॉक्टरांना सांगितलं की तुम्ही येथून जा. हे असले लबाड लोक आहेत, त्यामुळे मुंबई आणि महाराष्ट्राचं वाटोळं व्हायला लागलं आहे. हे डॉक्टर फुकट पगार खातेत. या ठिकाणी आलेले सर्व डॉक्टर निलंबित करायला पाहिजेत. आरोग्यमंत्र्यांना मी जाहीर सांगतो, जे आता तपासणीसाठी आले होते ते सर्वजण निलंबित करा. ते खोटं बोलून एखाद्याचा जीव घेतील. हे खोटे आरोप करतात. हे लोक खोटारडे आहेत, हे ध चा म करतात", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं.

## खळबळजनक विधान

## अमेरिकेच्या दाव्याचं काँग्रेसच्या नेत्याकडून समर्थन

# रशियन तेलाचा ब्राह्मणांना लाभ!

### एका विधानाची देशभरात चर्चा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लादल्याने दोन्ही देशांमधील संबंध तणावाचे बनले आहेत. यादरम्यान ट्रम्प यांचे व्यापारविषयक सल्लागार पीटर नवारो हे सातत्याने खळबळ उडवून देणारी विधाने करत आहेत. नुकतेच त्यांनी भारत सामान्य नागरिकांचं नुकसान करून ब्राह्मणांचा फायदा करून देत असल्याचे विधान केले आहे. या विधानाची सध्या राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा होत असून काँग्रेसचे नेते उदित राज यांनी रविवारी नवारो यांच्या विधानाचे समर्थन केले आहे.**





रशियाकडून तेल खरेदी करत असल्यावरून अमेरिकेने भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादला आहे. यावर बोलताना भारतातील उच्चवर्णीय कॉर्पोरेट हाऊसेस रशियाकडून कच्च्या तेलाच्या खरेदीतून नफा कमवत आहेत आणि नवारे यांनी जे म्हटले ते वस्तुस्थितीनुसार बरोबर असल्याचे काँग्रेस नेते म्हणाले आहेत.माजी खासदार उदित राज यांनी आरोप केला की रशियकडून तेल खरेदी केल्याचा फायदा फक्त देशातील उच्चवर्णीय उद्योजकांनाच पोहचत आहे.मी पीटर नवारो यांच्या विधानाशी पूर्णपणे सहमत आहेकी ब्राम्हणांच रशियाकडून तेल खरेदी केल्याचा फायदा होत आहे. हे देखील सत्य आहे की भारतातील बहुतेक कॉर्पोरेट हाऊसेस ही उच्चवर्णीयांकडून चालवली जातात. ते रशियाकडून तेल विकत घेतात, रिफाइन करतात आणि चढ्या दराने विकतात. सामान्य भारतीयांना यापासून काहीही फायदा होत नाही," असे काँग्रेस नेते म्हणाले.तसेच राज यांनी देशात मागासवर्गीय जाती आणि दलितांना कॉर्पोरेट हाऊस उभं करण्यासाठी १०० वर्ष लागतील असा दावा देखील यावेळी केला. "रुजलेल्या भेदभावामुळे पुढील १०० वर्षात देखील देशात मागास जाती आणि दलितांना कॉर्पोरेट हाऊस सुरू करता येईल असे मला वाटत नाही. नवारो जे म्हणाले ते वस्तुस्थितीनुसार बरोबर आहे आणि कोणीही ते नाकारू शकत नाही, असेही राज म्हणाले.पीटर नवारो यांनी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीमध्ये यासंदर्भात विधान केले. भारतातील काही निवडक श्रीमंत व्यावसायिकांचाच आर्थिक फायदा करून दिला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. "भारत म्हणजे क्रेमलिनसाठी (रशिया) फक्त धुणीघर आहे. भारतीयांचं नुकसान करून ब्राह्मणांचे खिसे भरताय. आपल्याला ते थांबवावं लागेल", असं पीटर नवारो म्हणाले. भारत रशियाकडून कच्चं तेल आयात करत असून त्यावर प्रक्रिया करून ते प्रीमियम दर्जाचं म्हणून युरोपला विकत आहे, असंही नवारो म्हणाले. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यास भारताने नकार दिल्यानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आधीच्या २५ टक्के टॅरिफमध्ये २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादले आहे. यानंतर अमेरिका-भारत संबंध गेल्या काही दिवसांपासून चांगलेच ताणले गेले आहेत.त असल्यावरून अमेरिकेने भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादला आहे. यावर बोलताना भारतातील उच्चवर्णीय कॉर्पोरेट हाऊसेस रशियाकडून कच्च्या तेलाच्या खरेदीतून नफा कमवत आहेत आणि नवारे यांनी जे म्हटले ते वस्तुस्थितीनुसार बरोबर असल्याचे काँग्रेस नेते म्हणाले आहेतरशियकडून तेल खरेदी केल्याचा फायदा फक्त देशातील उच्चवर्णीय उद्योजकांनाच पोहचत आहे.मी पीटर नवारो यांच्या विधानाशी पूर्णपणे सहमत आहेकी ब्राम्हणांच रशियाकडून तेल खरेदी केल्याचा फायदा होत आहे. हे देखील सत्य आहे की भारतातील बहुतेक कॉर्पोरेट हाऊसेस ही उच्चवर्णीयांकडून चालवली जातात.

### दोन्ही देशांमधील संबंध तणावाचे

सामान्य भारतीयांना यापासून काहीही फायदा होत नाही," असे काँग्रेस नेते म्हणाले.तसेच राज यांनी देशात मागासवर्गीय जाती आणि दलितांना कॉर्पोरेट हाऊस उभं करण्यासाठी १०० वर्ष लागतील असा दावा देखील यावेळी केला."रुजलेल्या भेदभावामुळे पुढील १०० वर्षात देखील देशात मागास जाती आणि दलितांना कॉर्पोरेट हाऊस सुरू करता येईल असे मला वाटत नाही.

## अणुबॉम्बनंतर आता हायड्रोजन बॉम्ब येणार

## राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी मागील काही दिवसांपासून केंद्रीय निवडणूक आयोगाला सातत्यानं लक्ष्य करत आहेत. मतदार याद्यांमधील कथित अनियमिततेच्या आरोपांवरून निवडणूक आयोगावर आणि भाजपावर मत चोरीचा आरोप करत घणाघाती टीका करत आहेत. काही दिवसांपूर्वी राहुल गांधी यांनी एक पत्रकार परिषद घेत काही पुराव्यांचंही सादरीकरण केलं होतं.**



तेव्हापासून राहुल गांधी सातत्याने मत चोरीचा आरोप करत सत्ताधाऱ्यांवर टीका करताना पाहायला मिळत आहेत. दरम्यान, राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी बिहारमध्ये 'व्होटर अधिकार यात्रा' काढली होती. या यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधी आणि तेजस्वी यादव बिहारच्या विविध शहरात जाऊन सभा आणि मेळावे घेतले. या व्होटर अधिकार यात्रेदरम्यान राहुल गांधींनी भाजपा आणि निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली.दरम्यान, या मतदार हक्क यात्रेच्या समारोपाच्या निमित्ताने जाहीर सभेत बोलताना राहुल गांधींनी आणखी एक मोठा इशारा दिला आहे. 'मत चोरीच्या अणुबॉम्बनंतर आता हायड्रोजन बॉम्ब येणार आहे', असं राहुल गांधींनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त जनसत्ताने दिलं आहे. तसेच या संदर्भातील राहुल गांधींच्या भाषणाचा एक व्हिडीओही काँग्रेसने एक्स (ट्विटर) शेअर देखील केला आच शक्ती आता संविधान नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र आम्ही त्यांना भारताचं संविधान नष्ट करू देणार नाहीत. आम्ही त्यासाठी बिहारमध्ये मतदार हक्क यात्रा काढली आणि या यात्रेला बिहारमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

### मत चोरीची जी सत्यता आहे.

भाजपाच्या काही लोकांनी काळे झेंडे दाखवले. आता मी भाजपाच्या लोकांना सांगतो की तुम्ही लक्ष देऊन ऐका. तुम्ही अणुबॉम्बचं नाव ऐकलं असेल. मात्र, त्यापेक्षा मोठं काय असतं? अणुबॉम्ब पेक्षा मोठा हायड्रोजन बॉम्ब असतो. महादेवपुरामध्ये आम्ही अणुबॉम्ब दाखवला. मात्र, आता हायड्रोजन बॉम्ब येणार आहे. मत चोरीची जी सत्यता आहे.



# गणेश उत्सव कसा साजरा करावा!

गणेश चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये गणपतीची मूर्तीचे आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुल, पत्री, नैवेद्य इत्यादी सोळा उपचारांनी पूजा केली जाते. यामध्ये त्याला विविध एकवीस पत्री अर्पण केल्या जातात. त्यामध्ये फराळ आगळा यांची २१ जोडी गणपतीला अर्पण केली जाते. पावसाळ्यात या सर्व पत्रे सामान्यता उपलब्ध असतात आणि प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्म सुद्धा आहेत. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी तिची उत्तर पूजा करतात. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी काही मंत्रही म्हणतात. जिथे गणपती बसवायचा असतो, तेथे मखर किंवा विविध साधनांनी सजावट केली जाते, लाइटिंग लावली जाते, गणपतीला वेगवेगळ्या पदार्थांचा नैवेद्य दररोज दिला जातो. लाडू व मोदक यांचा भोग लावल्या जातो. तसेच गणपतीची नावे वेगवेगळी आहेत. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणेश उत्सव साजरा केला जातो. एका मान्यतेनुसार श्रीगणेशाच्या अवतारांपैकी गणेश यांचा जन्म व भाद्रपद शुद्ध चतुर्थीला महादेव शिवशंकरांनी कैलास पर्वतावर भाद्रपद शुद्ध चतुर्थीला याच दिवशी जन्मोत्सव साजरा केला. श्रीगणेश यांनी शिंदूर दैत्यावर विजय मिळवला. तो दिवस भाद्रपद शुद्ध चतुर्थी हा होता. त्यामुळे हा उत्सव साजरा करण्यात आला ती पूर्व परंपरा आजही पाळली जाते. चतुर्थी श्री गणेशाची अत्यंत प्रिय तिथी आहे. चतुर्थी म्हणजे जागृती स्वप्न सुशुप्ती या पलिकडील अवस्था आहे. गणेश चतुर्थीचा उत्सव सार्वजनिक रित्या शनिवार वाड्यात सुरू केला गेला. व हा मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने साजरा केला जातो.

## गणेश उत्सवाविषयी पौराणिक कथा!

शिवपुरानाध्ये गणपती विषयीचा एक उल्लेख आढळतो. त्यामध्ये पार्वती एके दिवशी नंदीला द्वारपाल म्हणून नियुक्त करून स्नान करण्यास गेलीअसता यावेळी शंकर तेथे आले. त्यांनी नंदीस झुगारून न्हाणीघरात प्रवेश केला. यामुळे पार्वती अपमानित व रागाने क्षुब्ध झाली. शेवटी सखी जया व विजया यांच्या सल्ल्याने चिखलापासून एका सुंदर पुत्राची मूर्ती तिने निर्माण केली व त्यात प्राण फुंकले या पुत्रास तिने स्वतःचा अनुचर म्हणून नेमले नंतर एकेदिवशी या कुमार मुलास दारी नेमून पार्वती स्नानास गेली असता, शंकर तेथे उपस्थित झाले. यावेळी त्या कुमाराने शंकरास अडवले. पहिल्यांदा कुमारसोबत त्यांचा वाद व नंतर पार्वतीच्या मनातील रागाप्रमाणे युद्ध झाले. शिव व सर्व देवतागण या लढाईत पराजित झाले. तेव्हा नारदाच्या सल्ल्याने विष्णूद्वारे कुमारास मोहित करून शंकरांनी त्याचे मुंडके उडविले ही वार्ता ऐकून पार्वतीने क्रुद्ध होऊन सृष्टी नष्ट करण्यास प्रारंभ केला. नारद व देवगणांनी पार्वतीला शांत केले. तेव्हा पार्वतीने तिच्या पुत्राच्या पुनर्जीवनाची मागणी केली व तिचा पुत्र सगळ्यांना पूज्य व्हावा, अशी इच्छा व्यक्त केली. शंकरांनी त्यास होकार दिला. परंतु कुमाराचे मस्तक कोठेही न मिळाल्याने त्यांनी गणांस उत्तर दिशेस पाठवले व प्रथम जो प्राणी दिसेल त्याचे मस्तक आणण्याची आज्ञा केली. एका हत्तीचे मस्तक घेऊन उपस्थित झाले. देवगणांनी ह्या मुंडक्याच्या साहाय्याने कुमारास जिवंत केले. तर प्रांत शंकरांनी या मुलास स्वपुत्र म्हणून स्वीकारले व देवगण यांच्या आशिर्वादाने हा मुलगा पूज्य झाला व श्री गणेश नावाने प्रसिद्ध झाला. तसेच आणखीन एक गणपती विषयी अख्यायिका आहे. एकदा गणपती चतुर्थीचे स्वतःचे आवडीचे मोदक खाऊन उंदराच्या पाठीवरून जात होता. वाटेत साप दिसल्याने उंदिर भयाने कापू लागला. यामुळे गणपती उंदराच्या पाठीवरून खाली पडला व त्याचे पोट फाटून मोदक बाहेर पडले. गणपतीने ते सारे मोदक पुनः पोटात टाकले व पोटावर साप बांधला. हे दृश्य पाहून आकाशातील चंद्र हसू लागला. म्हणून तुझ्या रूपास चतुर्थीस कोणी दर्शन घेणार नाही. जो तुझे रूप पाहिल त्याचावर संकट येईल. असा शाप चंद्राला दिला, अशीही एक आख्यायिका प्रसिद्ध आहे.



**छप्परतोड कमाई** आयसीसीने बक्षीस रकमेत केली २९७ टक्क्यांनी वाढ

# महिला विजेते करणार छप्परतोड कमाई!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस भारतात सुरू होणाऱ्या वूमन्स वनडे वर्ल्डकपच्या बक्षीस रकमेत आयसीसीने घसघशीत वाढ केली. २०२३ मध्ये भारतात झालेल्या वनडे वर्ल्डकपवेळी पॅट कमिन्सच्या नेतृत्वात खेळणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या संघाने जेतेपदावर नाव कोरलं होतं. कमिन्सच्या संघाने जेतेपदावर नाव कोरत जेवढी कमाई केली त्यापेक्षा जास्त रक्कम महिला वनडे वर्ल्डकपविजेत्या संघाला मिळणार आहे.**

## ऑस्ट्रेलियाच्या संघाने जेतेपदावर नाव कोरलं




आयसीसीने सोमवारी वनडे वर्ल्डकपसाठी बक्षीसाची घोषणा केली. २०२२ मध्ये न्यूझीलंडमध्ये झालेल्या वर्ल्डकपच्या तुलनेत २९७ टक्क्यांनी बक्षीस रकमेत वाढ करण्यात आली आहे. भारतात होणाऱ्या वर्ल्डकपसाठी १३.८८ मिलिअन डॉलर्स इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. न्यूझीलंडमध्ये झालेल्या स्पर्धेवेळी बक्षीस रक्कम अवघी ३.५ मिलिअन डॉलर एवढीच होती.२०२३ मध्ये झालेल्या पुरुषांच्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेत बक्षीस रक्कम १० मिलिअन डॉलर एवढी होती. महिलांच्या स्पर्धेसाठी आयसीसीने तिजोरी मुक्तपणे खुली करण्याचा निर्णय घेतला आहे. २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या नवी मुंबई किंवा कोलंबो इथे होणाऱ्या अंतिम लढतीच्या विजेत्या संघाला ४.४८ मिलिअन डॉलर्स बक्षीस रकमेने गौरवण्यात येणार आहे. विजेत्या ऑस्ट्रेलियाच्या संघाला १.३२ मिलिअन डॉलर्स रकमेने सन्मानित करण्यात आलं होतं. पॅट कमिन्सच्या संघाने २०२३ मध्ये वर्ल्डकपच्या जेतेपदावर नाव कोरलं. ४ मिलिअन डॉलर्स रकमेने त्यांना गौरवण्यात आलं होतं.उपविजेत्या संघाला २.२४ मिलिअन डॉलर्स रकम मिळणार आहे. सेमी फायनलमध्ये धडक मारणाऱ्या चार संघांना प्रत्येकी १.१२ मिलिअन डॉलर्स एवढी रक्कम मिळेल. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस भारतात सुरू होणाऱ्या वूमन्स वनडे वर्ल्डकपच्या बक्षीस रकमेत आयसीसीने घसघशीत वाढ केली. २०२३ मध्ये भारतात झालेल्या वनडे वर्ल्डकपवेळी पॅट कमिन्सच्या नेतृत्वात खेळणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या संघाने जेतेपदावर नाव कोरलं होतं.

कमिन्सच्या संघाने जेतेपदावर नाव कोरत जेवढी कमाई केली त्यापेक्षा जास्त रक्कम महिला वनडे वर्ल्डकपविजेत्या संघाला मिळणार आहे. आयसीसीने सोमवारी वनडे वर्ल्डकपसाठी बक्षीसाची घोषणा केली. २०२२ मध्ये न्यूझीलंडमध्ये झालेल्या वर्ल्डकपच्या तुलनेत २९७ टक्क्यांनी बक्षीस रकमेत वाढ करण्यात आली आहे.

## अवघी ३.५ मिलिअन डॉलर एवढीच

आयसीसीने सोमवारी वनडे वर्ल्डकपसाठी बक्षीसाची घोषणा केली. २०२२ मध्ये न्यूझीलंडमध्ये झालेल्या वर्ल्डकपच्या तुलनेत २९७ टक्क्यांनी बक्षीस रकमेत वाढ करण्यात आली आहे. भारतात होणाऱ्या वर्ल्डकपसाठी १३.८८ मिलिअन डॉलर्स इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. न्यूझीलंडमध्ये झालेल्या स्पर्धेवेळी बक्षीस रक्कम अवघी ३.५ मिलिअन डॉलर एवढीच होती.

भारतात होणाऱ्या वर्ल्डकपसाठी १३.८८ मिलिअन डॉलर्स इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. न्यूझीलंडमध्ये झालेल्या स्पर्धेवेळी बक्षीस रक्कम अवघी ३.५ मिलिअन डॉलर एवढीच होती.२०२३ मध्ये झालेल्या पुरुषांच्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेत बक्षीस रक्कम १० मिलिअन डॉलर एवढी होती. महिलांच्या स्पर्धेसाठी आयसीसीने तिजोरी मुक्तपणे खुली करण्याचा निर्णय घेतला आहे. २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या नवी मुंबई किंवा कोलंबो इथे होणाऱ्या अंतिम लढतीच्या विजेत्या संघाला ४.४८ मिलिअन डॉलर्स बक्षीस रकमेने गौरवण्यात येणार आहे. विजेत्या ऑस्ट्रेलियाच्या संघाला १.३२ मिलिअन डॉलर्स रकमेने सन्मानित करण्यात आलं होतं. पॅट कमिन्सच्या संघाने २०२३ मध्ये वर्ल्डकपच्या जेतेपदावर नाव कोरलं. ४ मिलिअन डॉलर्स रकमेने त्यांना गौरवण्यात आलं होतं.उपविजेत्या संघाला २.२४ मिलिअन डॉलर्स रकम मिळणार आहे. सेमी फायनलमध्ये धडक मारणाऱ्या चार संघांना प्रत्येकी १.१२ मिलिअन डॉलर्स एवढी रक्कम मिळेल. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस भारतात सुरू होणाऱ्या वूमन्स वनडे वर्ल्डकपच्या बक्षीस रकमेत आयसीसीने घसघशीत वाढ केली. २०२३ मध्ये भारतात झालेल्या वनडे वर्ल्डकपवेळी पॅट कमिन्सच्या नेतृत्वात खेळणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या संघाने जेतेपदावर नाव कोरलं होतं. कमिन्सच्या संघाने जेतेपदावर नाव कोरत जेवढी कमाई केली त्यापेक्षा जास्त रक्कम महिला वनडे वर्ल्डकपविजेत्या संघाला मिळणार आहे.

# टीव्हीवर प्रक्षेपण नाही, मैदानात प्रवेश नाही

## फेन्सिंगवरून पाहायची सक्ती; दुलीप ट्रॉफीचे सामने दुर्लक्षित

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**एकेकाळी डोमेस्टिक क्रिकेटमधली मानाची स्पर्धा अशी ओळख असलेल्या दुलीप ट्रॉफी स्पर्धेची रया गेल्याचं चित्र आहे. यंदा सुरू झालेल्या दुलीप ट्रॉफी स्पर्धेचं टीव्हीवर थेट प्रक्षेपण उपलब्ध नाहीये. एकीकडे दिल्ली प्रीमिअर लीग, उत्तर प्रदेश प्रीमिअर लीग, महाराजा ट्रॉफी अशा स्थानिक राज्य पातळीवरील स्पर्धांचं प्रक्षेपण टीव्हीवर उपलब्ध आहे असलेल्या स्पर्धेला प्रक्षेपण मिळू नये हे एक आश्चर्यच आहे.**



यंदाच्या दुलीप ट्रॉफी स्पर्धेचे सामने बंगळुरूतल्या बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स इथे सुरू झाले. देशातील अव्वल खेळाडू या सामन्यात खेळले मात्र या सामन्यांचं थेट प्रक्षेपण टीव्हीवर उपलब्ध नव्हतं. दुसरीकडे मैदानात प्रत्यक्ष येऊन हे सामने पाहण्याची चाहत्यांची संधीही नाकारण्यात आली.

काही दर्दी चाहते हे सामने पाहण्यासाठी मैदानात पोहोचले. त्यांना तारांच्या कुंपणावरून वायरींच्या मधून सामन्याचा आस्वाद घ्यावा लागला. एकीकडे आयपीएलला हजारोंची गर्दी लोटत असताना बाकी डोमेस्टिक स्पर्धा चाहत्यांविना अस्तंगत होत असल्याचे चित्र आहे.गेल्या हंगामात बंगळुरूजवळच्या अलूर इथे कर्नाटक-केरळ सामन्यावेळी संजू सॅमसनचा खेळ पाहण्यासाठी काही चाहते मैदानात पोहोचले. मात्र त्यांना पांगवण्यात आलं. या मैदानात प्रेक्षकांना बसून सामना पाहता येईल असे स्टँड्स नाहीत हे कारण देण्यात आलं. सुरक्षेला प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आल्याचं प्रशासनाने सांगितलं. देशभरात क्रिकेटप्रति चाहत्यांचा उत्साह लक्षात घेता असे स्टँड्स उभारणं प्रशासनाला कठीण नाही मात्र डोमेस्टिक सामन्यांप्रति अनास्था हे यामागचं कारण आहे.

## दुसरीकडे हलवल्याने मनस्ताप

३० सप्टेंबरपासून सुरू होत असलेल्या महिला वनडे वर्ल्डकपच्या तिकिटांची विक्री अजूनही सुरू झालेली नाही. २०२३ मध्ये भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात धरमशाला इथे होणारा कसोटी सामना अगदी आयत्यावेळी रद्द करून अन्यत्र खेळवण्यात आला. धरमशाला इथे पोहोचणं भौगोलिकदृष्ट्या अवघड आहे. सामना ऐनवेळी दुसरीकडे हलवल्याने चाहत्यांना मनस्ताप झाला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार।
। दि. 2 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# चऱ्होली भाजपाच्या ‘आप्पांचा’ बालेकिल्ला! शिवसेनेच्या ‘भाऊं’साठी वर्चस्वाची लढाई!

## ग्राऊंड रिपोर्ट: प्रभाग क्रमांक 3 मध्ये भाजपा-राष्ट्रवादी- शिवसेना लढत

### भाजपाकडे गर्दी: राष्ट्रवादी श.प., काँग्रेस, शिंदे सेनेकडे उमेदवारांची वानवा

। पिंपरी चिंचवड । अविनाश आदक : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली. ऑक्टोबरमध्ये हरकती आणि सूचनांची सुनावणी होईल आणि सदरची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. त्यानंतर आरक्षण सोडत आणि निवडणूक आचारसंहिता सुरू होईल. डिसेंबरमध्ये मतदान आणि जानेवारी-2026 मध्ये महानगरपालिकेत नवीन महापौर विराजमान होतील. या निमित्ताने “महाईन्यूज” च्या माध्यमातून प्रभागनिहाय राजकीय स्थितीबाबत विश्लेषण पहिला “ग्राऊंड रिपोर्ट” प्रसिद्ध करीत आहोत. चऱ्होली भाजपाच्या ‘आप्पांचा’ बालेकिल्ला; शिवसेनेच्या ‘भाऊं’साठी वर्चस्वाची लढाई!, अशी स्थिती आहे.**







“ विकासकामांच्या जोरावर भाजपाच्या प्रभागातील चारही जागा निवडून येतील. समाविष्ट गावांचा भाजपामुळे कायापालट झाला आहे. माझ्या कार्यकाळात सुमारे 52 किलोमीटरचे रस्ते झाले आहेत. विधानसभा निवडणुकीत या प्रभागातून आमदार महेश लांडगे यांना सुमारे 12 हजार मतांचे लीड मिळाले होते. त्याची पुनरावृत्ती आता महापालिका निवडणुकीत होईल.
**–नितीन काळजे,** माजी महापौर.



“ प्रशासक काळातील 3 वर्षांत नगरसेवकांना लोक विसरले आहेत. विद्यमान लोकांकडे फिरकले नाही. माजी झाले तरी नगरसेवक तेच आहेत, अशी लोकांची भावना होती. नागरी सुविधांच्या बाबतील प्रचंड अनास्था आहे. भोसरीतील संत ज्ञानेश्वरनगरचा भाग प्रभागाला जोडला आहे. त्यामुळे त्या भागातील लोकांवर अन्याय होतो आहे
**.– धनंजय आल्हाट,** शिवसेना उबाठा.

2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग “रचना जैसे थे” आहे. प्रभाग क्रमांक २ मध्ये कोणताही बदल नाही. ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगनना ग्रहीत धरण्यात आली आहे. तत्कालीन जनगननेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 51 हजार 628 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 6 हजार 828 इतकी अनुसूचित जाती आणि 1 हजार 75 इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 मध्ये या प्रभागामध्ये भाजपाची मोठी लाट होती. या प्रभागातून भाजपाचे तीन आणि राष्ट्रवादीचा एक उमेदवार निवडून आले होते. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या इतिहासातील भाजपाचे पहिले महापौर म्हणून ज्यांना ओळख मिळाली. ते नितीन काळजे या प्रभागातून प्रतिनिधीत्व करतात. या प्रभागातून भाजपाच्या




शैला मोळक यांना गत निवडणुकीत पराभव पत्करावा लागला होता.

नितीन काळजे यांनी 10 हजार 593 मते मिळवत, शिवसेनेच्या धनंजय आल्हाट यांचा पराभव केला होता.

आल्हाट आता शिवसेना ठाकरे गटात आहेत. सुवर्णा बुर्डे यांनी ब गटातून 10 हजार 335 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या मंदा आल्हाट यांचा पराभव केला होता. तसेच, राष्ट्रवादीच्या विनया तापकीर यांनी क- गटातून भाजपाच्या शैला मोळक यांचा पराभव केला होता. त्यांनी 8 हजार 389 मते घेतली होती. ड- गटातून सर्वसाधारण जागेसाठी भाजपाकडून लक्ष्मण सस्ते यांनी निवडणूक लढवली होती. त्यांनी 9 हजार 183 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या संजय पठारे यांचा (7 हजार 551) पराभव केला होता.

भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांचे एकेकाळी कट्टर समर्थक असलेले लक्ष्मण सस्ते यांनी 2022 च्या महापालिका निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर भाजपाने या ठिकाणी दुसऱ्या फळीतील उमेदवारांना मोठी ताकद दिली आहे.

2017 च्या आरक्षणानुसार, अ- नागरिकांचा मागास प्रवर्ग, ब- सर्वसाधारण महिला, क- सर्वसाधारण महिला आणि ड- सर्वसाधारण असे आरक्षण होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला 50 टक्के आरक्षण आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, ओबीसी आरक्षण पूर्ववत ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आरक्षणामध्ये काही फार बदल होईल, असे चित्र नाही.

### पक्षनिहाय इच्छुकांची नावे :

**1. भारतीय जनता पार्टी :** माजी महापौर नितीन काळजे, सचिन तापकीर, सुवर्णा बुर्डे, शैला मोळक, साधना तापकीर, पल्लवी बुर्डे, मनिषा तापकीर, सुनील काटे, योगेश तळेकर, सचिन तळेकर, रमेश वहीले, गणेश सस्ते, राजेश सस्ते, वंदना आल्हाट.
**2. राष्ट्रवादी अ.प. गट :** विनया तापकीर, लक्ष्मण सस्ते, दत्ता बुर्डे, ज्योती तापकीर, घनश्याम खेडकर, मंदाताई आल्हाट, प्रकाश आल्हाट.
**3. शिवसेना शिंदे गट :** अद्याप कोणी नाही.
**4. राष्ट्रवादी श.प. गट :** अद्याप कोणी नाही.
**5. शिवसेना उबाठा गट :** धनंजय आल्हाट, कुणाल तापकीर.
**6. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :** अद्याप कोणी नाही.

### प्रभागातील समाविष्ट भाग :

मोशी गावठाण, गंधर्वनगरी, संत ज्ञानेश्वरनगर भाग, साई मंदिर परिसर, गोखले मळा, वडमुखवाडी, काळजेवाडी, पठारेमळा, ताजणेमळा, चोविसावाडी, चऱ्होली, डुडुळगाव आदी.

### 2017 मधील विजयी उमेदवार :

अ - नितीन काळजे - भाजपा
ब - सुवर्णा बुर्डे - भाजपा
क- विनया तापकीर - राष्ट्रवादी (अ.प.)
ड - लक्ष्मण सस्ते - भाजपा

## राष्ट्रीय स्तरावरील 24 तासांच्या हॅकेथॉन स्पर्धेचे भव्य उद्घाटन

# कुरुक्षेत्र 2025' तरुणांसाठी प्रभावी व्यासपीठ -वाफारे

### शिक्षण विश्व: कुरुक्षेत्र 2025 हॅकेथॉन माईर्स एमआयटी महाविद्यालयात उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**'कुरुक्षेत्र २०२५' ही केवळ कोडिंग स्पर्धा न राहता, तरुणांना सर्जनशीलता, सहकार्य आणि समाजाभिमुख नवोन्मेषासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरले आहे असे मत माईर्स एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांनी सांगितले..**

माईर्स एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात 'कुरुक्षेत्र २०२५ – द युग ऑफ इनोव्हेशन' या राष्ट्रीय स्तरावरील २४ तासांच्या हॅकेथॉन स्पर्धेचे भव्य उद्‍घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. मोजिला एमआयटी एसीएससी क्लब आणि इन्स्टिट्युशन इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या हॅकफेस्टला देशभरातील तरुण तंत्रज्ञांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत एकूण १४९ संघांनी सहभाग नोंदवला असून १०० हून अधिक महाविद्यालये व विद्यापीठांचे प्रतिनिधित्व झाले. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तेलंगणा यांसारख्या राज्यांतील अभियांत्रिकी, विज्ञान, व्यवस्थापन आणि पॉलिटेक्निक क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग या स्पर्धेत पाहायला मिळाला. एआय, डेटा सायन्स, एजंटिक एआय, सायबर सिक्युरिटी, ब्लॉकचेन आणि ओपन इनोव्हेशन या प्रगत तंत्रज्ञान विषयांवर विद्यार्थ्यांनी नवनवीन उपाययोजना सादर केल्या.

या हॅकेथॉनमध्ये सहभागी झालेल्याप्रमुखशैक्षणिकसंस्थांमध्ये एमआयटी-एडीटी विद्यापीठ, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, एआयएसएसएमएस आयओआयटी व सीओई, जी. एच. रायसोनी ग्रुप ऑफ कॉलेजेस, सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, संदिप युनिव्हर्सिटी नाशिक, डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय कोल्हापूर, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी इस्लामपूर, संजीवनी युनिव्हर्सिटी कोपरगाव, आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पुणे, भारती विद्यापीठ पुणे व सोलापूर, साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटीचे ग्रॅज्युएट स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी नवी मुंबई, लोकमान्य टिळक अभियांत्रिकी महाविद्यालय नवी मुंबई, ज्ञानगंगा इन्स्टिट्यूट जबलपूर, ओरिएंटल इन्स्टिट्यूट भोपाळ, सीएमआर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी तेलंगणा, संजय घोडावत विद्यापीठ कोल्हापूर यांचा समावेश होता. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, उपसंचालिका डॉ. अक्षदा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. तसेच प्रा. अभिजित नेटके,

---

## डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि केन्स सेमिकॉन यांच्यात करार

### शिक्षण विश्व : उद्योगाभिमुख अभ्यासक्रम विकास उपक्रम विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा ठरणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आकुर्डी आणि केन्स सेमिकॉन प्रा. लि साणंद, गुजरात यांनी सेमिकंडक्टर शिक्षण क्षेत्रात प्रगती घडवून आणण्यासाठी तसेच उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.**

या करार वेळी केन्स सेमिकॉन प्रा. लि. चे मुख्य कार्यकारी अधिकारी रघू पनिकर आणि डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मनीष भल्ला यांच्या हस्ते स्वाक्षरीत झाला. या कराराअंतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप संधी, संयुक्त संशोधन प्रकल्प, प्राध्यापक प्रशिक्षण, ज्ञान देवाण-घेवाण आणि उद्योगाभिमुख अभ्यासक्रम विकास यांसारख्या उपक्रमांवर सहकार्य करण्यात येणार आहे. या करारामुळे सैद्धांतिक शिक्षण आणि प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव यामधील दरी कमी होऊन विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्णता व उद्योगाभिमुख कौशल्य विकसित होईल. या प्रसंगी केन्स सेमिकॉन प्रा. लि. चे मुख्य कार्यकारी अधिकारी पनिकर यांनी भारतातील वाढत्या सेमिकंडक्टर व्यावसायिकांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी उद्योग-शैक्षणिक सहकार्य अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित केले. तसेच विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. भल्ला यांनी या सहकार्यामुळे विद्यापीठाच्या जागतिक स्तरावर उद्योगाभिमुख शिक्षण देण्याच्या दृष्टीला बळ मिळेल आणि भारताच्या 'ग्लोबल सेमिकंडक्टर हब' होण्याच्या ध्येयात हातभार लागेल, असे सांगितले. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठ हे भारतातील पहिले बी.टेक. सेमिकंडक्टर इंजिनिअरिंग कार्यक्रम राबवणारे विद्यापीठ असून अलीकडेच त्यांनी सेमिकंडक्टर शिक्षणासाठी अत्याधुनिक क्लीन रूम सुविधा उभारली आहे. तर केन्स सेमिकॉन प्रा. लि. कडे साणंद येथे उद्योगमान्य क्लीन रूम व अत्याधुनिक उत्पादन सुविधा असून, त्यांना सेमिकंडक्टर उत्पादन व सोल्यूशन्समधील समृद्ध अनुभव आहे. या कराराबाबत संस्थेचे संस्थेचे चेअरमन सतेज डी. पाटील यांनी अभिनंदन करताना सांगितले की, हा सामंजस्य करार भारतातील सेमिकंडक्टर शिक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे आणि देशाला उच्च तंत्रज्ञान निर्मिती क्षेत्रातील सक्षम व कौशल्यपूर्ण व्यावसायिक घडविण्यासाठी तो पायाभूत ठरेल. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस एस. पाटील, संस्थेचे अध्यक्ष तथा कुलपती डॉ संजय डी पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046